SJIF 2015 : 3.801
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क

**निशा सिताराम मोरे, Ph. D.**

*(सहयोगी प्राध्यापक), श्रीमती. सी. के. गोयल कला व वाणिज्य महाविद्यालय, दापोडी, पुणे*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

२० वे शतक हे दोन महायुद्धांचा अनुभव असणारे शतक होय. मनुष्य हा जसा समाजशिल प्राणी आहे तसाच तो भांडखोर प्राणी आहे. मनुष्य जात अस्तित्वात आल्यापासून व्यक्ती व्यक्तीत भांडण होत आलेले आहे. जसा तो भांडखोर आहे तसाच तो तडजोड शील प्राणी देखिल आहे. त्यामुळे प्राचिन काळापासून मनुष्य– मनुष्यामध्ये भांडण चालत

पहिल्या महायुद्धाचा कालखंड १९१४ से १९१९ हा होता. पहिल्या महायुद्धात मोठ्या प्रमाणात मनुष्य व वित्त हानी झाली. पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांतता टिकविण्याच्या दृष्टिने अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी प्रयत्नाने १९२० साली राष्ट्रसंघ ही जागतिक स्तरावरील संघटना स्थापन करण्यात आली. जगात पुन: शांतता प्रस्थापित करण्यासाठी हा प्रयत्न केला गेला: परंतु जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी हा प्रयत्न निष्फळ ठरला. लवकरच म्हणजे १९३९ साली दुसरे महायुद्ध पेटले. पहिल्या महायुद्धापेक्षा अधिक प्रचंड प्रमाणात दुसऱ्या महायुद्धात मनुष्य व वित्त हानी झाली. सर्व जगाला या महायुद्धाची प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे झळ पोहोचली. दुसऱ्या महायुद्धाच्या षण मानव संहाराकडे पहाता आता तिसरे महायुद्ध होऊ नये तसेच अखिल मानव जातीस युद्धातुन वाचविण्यासाठी उपाययोजना करण्याच्या विचारातुन संयुक्त राष्ट्र संघटनेनी निर्मिती झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघटना निर्माण करतांना जागतिक पातळीवरून प्रयत्न करण्यात आले. काही महत्वाच्या शिखर परिषदा, जागतिक शिखर संम्मेलनातून बहुसंख्य राष्ट्रांनी युद्धापासून मुक्ती ची इच्छा दर्शविली. जागतिक लोकमत देखिल याच मताचे होते.

काही महत्वाच्या परिषदांमध्ये डिक्लरेशन ऑफ सेंट जेम्स पॅलेस १९४१ (सेंट जेम्स राजवाड्यतील जाहीरनामा), अटलांटिक चार्टर १४ ऑगस्ट १९४१, युनायटेड नेशन्स डिक्लरेशन १ जानेवारी १९४२ (संयुक्त राष्ट्र संघाची घोषणा), मॉस्को कॉन्फरन्स ३० ऑक्टोबर १९४३( मॉस्को परिषद), तेहरान कॉन्फरन्स (तेहरान परिषद) १डिसेंबर १९४३, डंबार्टन ओक्स कॉन्फरन्स (डंबार्टन ओक्स परिषद) ऑगस्ट – सप्टेंबर १९४४. डंबार्टन ओक्स परिषदेत चीन, ब्रिटन, अमेरिका व सोव्हिएत रशिया या देशांचे प्रतिनिधींनी एकत्रीतपणे युनोच्या संस्थापने संदर्भात विचार करून १९४४ साली या चार राष्ट्रांनी जागतिक संघटना स्थापना करारावर संमती दर्शविली. सर्वानुमते या जागतिक संघटनेचे नाव 'संयुक्त राष्ट्र संघटना' ठेवण्यात

आले. याल्टा परिषद १९४५ नुसार अमेरिकन अध्यक्ष रुझवेल्ट , ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल व रशियाचे अध्यक्ष स्टॅलिन क्रिमियातील याल्टा या शहरात युनोच्या निर्मितीचा निर्णय घेण्यात आला. आणि एप्रिल १९४५ मध्ये सॅनफ्रान्सिस्को येथे युनोची सनद तयार करण्यासाठी निर्णय घेण्यात आला. ठरल्याप्रमाणे १९४५ मध्ये सॅनफ्रान्सिस्को येथे परिषद भरली. या परिषदेत ५० राष्ट्रांनी सहभाग घेतला. त्यात भारत सहभागी झाला होता. त्यामुळे भारताला युनोचे मूळ सभासदत्व मिळाले. २४ ऑक्टोबर १९४५ राजी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी जागतिक स्तरावरील संयुक्त राष्ट्र संघटना (युनो) ही संस्था अस्तित्वात आली.

**संयुक्त राष्ट्र संघटना (युनो) :** संयुक्त राष्ट्र संघटना ही एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. सदर संघटनानेच्या उद्दिष्टांमध्ये युद्ध थांबविणे मानवी हक्क हे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. द्वितीय महायुद्धात जीवित व वित्त हानी झाली. मोठ्या प्रमाणात मानवसंहार झाला. या घटनांना आळा घालण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली.

**संयुक्त राष्ट्र संघटनेची ध्येय व उद्दिष्ट्ये :** युनोच्या सनदेच्या सरनाम्यात प्रामुख्याने युनोची ध्येय व उद्दिष्ट्ये स्पष्ट करण्यात आली आहेत. त्या मध्ये प्रामुख्याने पुढीलप्रमाणे ध्येय उद्दिष्टांचा समावेश केला आहे.

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविणे.

२. राष्ट्रा – राष्ट्रात मैत्रीचे संबंध वाढविणे.

३. आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी प्रश्न सोडविण्यासाठी एकमेकांशी सहकार्य करणे व मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याविषयी आदर वाढविणे.

४. वरील ध्येय व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राष्ट्राराष्ट्रात सुसंवाद साधण्यासाठी जागतिक केंद्र बनणे.

**संयुक्त राष्ट्रसंघटनेची मानवी हक्क सनद** : युनोला जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी घटनेची आवश्यता होती. युनोने १११ कलमांची व १९ परिशिष्ट असणारी सनद तयार केली व सनदेसोबत एक सरनामा तयार केला. या सरनाम्यात भावी पिढ्यांचे युद्धापासून संरक्षण करण्याचा, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्याचे ध्येय स्पष्ट होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेत कलम १ मध्ये मानवी हक्काचा विकास करणे व मानवी हक्कांचा आदर करणे व मानवी हक्क विकासासाठी जागतिक सहकार्य मिळवणे यांची नोंद आहे. सर्वांना वंश, धर्म, भाषा व लिंग यांचा भेद न करता मूलभूत स्वातंत्र्य मिळवून देणे हे प्रमुख ध्येय असल्याचे नमूद केले आहे. सदर सनदे अनुसार मानवी हक्कांचे संरक्षण व मानवी हक्कांचा पुरस्कार यांची जबाबदारी युनोने घेलल्याचे स्पष्ट होते.

अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. रुझवेल्ट यांची पत्नी एलिनॉर रुझवेल्ट यांनी मानवी हक्क सनद तयार करण्यासाठी मोलाचे कार्य केले. १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्क सनद आयोगाच्या शिफारशींना युनोने मान्यता दिली. तसेच १० डिसेंबर १९५० रोजी महासभेने मानवी हक्कांच्या सनदेच्या वैश्विक अंमलबजावणीस मान्यता दिली. प्रत्येक व्यक्तीला मानवी हक्क आहेत व त्याचा संकोच करण्याचा अधिकार सार्वभौम सत्तेलाही नाही, हा विचार आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता पावला आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेमध्ये मानवी हक्कांना प्राथमिता देण्यात आली आहे. कलम १३ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य रक्षणाकरिता सूचना करायच्या आहेत. याशिवाय कलम १,५५,५६,६२,६८, व ७६ या कलमांमध्ये मानवी हक्क निर्देशित झालेली आहेत. कलम ५५ नुसार राहणीमान वाढविणे, सर्वांना रोजगार मिळवून देणे, सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणणे ही संयुक्त राष्टांची उद्दिष्टे आहेत. मानवी हक्क जाहिरनाम्यात एकूण ३० कलमे आहेत. यात पाश्चात्या देशातील नागरी स्वातंत्र्याबाबतीतील कलमे आहेत. आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टिने ( कलम १२३), रोजगाराचा अधिकार म्हणजे समान कामासाठी समान वेतन, मजूर संघटना स्थापन करण्याचा व त्यात सहभागी होण्याच अधिकार, विश्रांतीचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार यांचा समावेश होतो.

**मानवी हक्क :** आंतरराष्ट्रीय मान्यतेनुसार मानवी हक्क म्हणजे, माणुस म्हणून जन्माला आल्यामुळे त्याला मिळणारे हक्क देश, जात, वर्ण, लिंग आधारित सर्व भेदांना छेद देऊन माणुस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला हा अधिकार प्राप्त होतो. हा अधिकार व्यक्तीला कोणी देऊ शकत नाही किंवा त्याचा हा अधिकार कोणी काढून घेऊ शकत नाही. माणसाला माणुस म्हणून जगण्यासाठी जे हक्क आवश्यक असतात त्यांना मानवी अधिकार असे म्हणतात. मानवी हक्कात मानसाचे स्वत्व व त्याचा स्वाभिमान, आत्मसंम्मान यांच्या जपणूकीकडे विशेष लक्ष दिले जाते.

मानवी हक्कांच्या जपणुकीसाठी केवळ देश स्वतंत्र असणे आवश्यक नाही. स्वतंत्र देशाच्या राज्यघटनेत मानवी हक्कांची तरतूद केली असतांना देखील हक्कांची पायमल्ली होऊ शकते. म्हणून मानवी हक्कांच्या रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या अबाधित राहण्याची हमी आवश्यक आहे. १९४८ साली मानवी हक्कांची घोषणा वैश्वीक पातळीवर करण्यात आली. त्याचा उद्देश मानवी हक्क अबाधित राखणे हा होता. या घोषणापत्रकावर इतर ४८ देशांप्रमाणे भारताने स्वक्षरी केली.

मानवी हक्कामध्ये सन्मानाने जगण्यासाठी अथवा जगता येण्यासाठी मानवी आरोग्य व आरोग्यसेवांचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. मानवाच्या प्राथमिक गरजांमध्ये आरोग्यसेवा ही अत्यंत महत्वाची गरज आहे त्याची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक शासन कटिबद्ध असणे गरजेचे आहे. हिच महत्वपूर्ण बाब मानवी हक्क या संकल्पनेत अधोरेखित होतांना दिसते. या कारणाने आरोग्य सेवा या गरज न राहता ते सर्वसामान्यांच्या हक्क बनल्या.

**मानवी हक्क विश्व घोषणा : १९४८:** सर्व मानव जन्मत: स्वतंत्र आहेत. तसेच प्रतिष्ठा व हक्कांच्या बाबतीत समान आहेत. त्यांना प्रतिभा व सद्सद्विवेक बुद्धी आहे. त्यांनी परस्परांशी बंधुभावाने वागले पाहिजे.

**हक्कांची निर्मिती :** अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या जातात. या गरजांद्वारे मानवाचा संर्वांगिण विकास शक्य असतो. त्याच प्रमाणे इतर अनेक गरजांची परिपूर्तता मानवी समाजाकडून होणे आवश्यक असते. या गरजा शारीरिक , मानसिक आणि आर्थिक आहेत. आपण या गरजांवर आधारित समाजात रहातो. या गरजांमधून हक्कांची निर्मिती होते. मानव आणी समाज एकमेकांच्या गरजा भागवतात. मानवाच्या गरजाच्या संकल्पनेतून मानवी हक्क ही संकल्पना निर्माण झाली. उदा. शारीरिक गरज – अन्न, वस्त्र, निवारा, मानसिक गरज– माणसाच्या विचार प्रवृत्तीशी संबंधित असतात. सामाजिक गरजा – पुरुष, स्त्रीया आणि मुले यांच्या सामुहिक परिस्थिती परस्परांशी संबंधित असतात. आर्थिक गरजा –

पैशांची उपलब्धता, कामाचा हक्क, माणसाच्या आर्थिक गरजांमधून किंवा सुखाच्या शोधातून निर्माण झालेली आहे. हक्कांचा संबंध कर्तव्यांशी देखिल असतो. हक्क हा शब्द एकाच अर्थाने वापरला जात असला तरी असे म्हणता येईल की ' एखाद्या व्यक्तीला हक्क आहेत असे म्हणणे म्हणजे हे मिळविण्याचा त्याला अधिकार आहे असे म्हणता येईल'.

**मानवी हक्क म्हणजे काय ( इतिहास) –** मनुष्य प्राणी हा पशु पक्षी व समुद्री जीव या सारखा स्वतंत्र अस्तित्व घेऊन जन्माला आला. हे स्वतंत्र्य त्याला निसर्गत: मिळाले. ज्या प्रमाणे मनुष्याला स्वातंत्र्य हे नैसर्गिकरित्या मिळाले आहे त्याच प्रमाणे त्याला काही मुलभूत हक्क देखील जन्मत: प्राप्त होतात. प्रत्येक व्यक्तीला जे मूलभूत अधिकार निसर्गत:च म्हणजे जन्मत: प्राप्त झालेले असतात त्यांना मानवी हक्क असे म्हणतात. या विचाराला आता जगभर मान्यता मिळाली आहे. मानवी हक्कांना मान्यता प्राप्त मिळण्यासाठी मानवाला मोठा संघर्ष करावा लागला आहे. मानवी हक्काची संकल्पना नैसर्गिक न्याय या विचारातून विकसित झाली. ही संकल्पना ग्रीक व रोमन विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती तत्वज्ञानात पहावयास मिळते. टॉमस अक्वायन या विधितज्ञाच्या द्वारे मांडलेली दिसून येते. ह्युगो ग्रोशिअस या सतराव्या शतकातील आंतरराष्ट्रीय कायद्याचा जनक म्हणून मान्यता पावलेल्या व त्यानंतर मिल्टन आणि लॉक यांच्या विचारांत ही संकल्पना आढळून येते. इंग्लंड मध्ये (१२१५), पासून मॅग्नाकार्टा हा कायदा संमत झाला तेंव्हा पासून राज्यसत्तेवर बंधने असायला पाहिजे ही कल्पना पुढे आली. १६२८ मध्ये पिटिशन ऑफ राइट्स आणि १६८९ मधील अधिकारांची सनद – बील ऑफ राइट्स याद्वारे अधिक स्पष्टता आली. अमेरिकन स्वातंत्र्य (१७७६), आणि अमेरिकेतील मूलभूत स्वातंत्र्याचा जाहिरनामा (१७९१), यात मानवी हक्कांचे रक्षण हा मुद्दा महत्वाचा आहे. फ्रांसची राज्यक्राती (१७८९), या राज्यक्रांती मागे मानवी हक्क सुरक्षित ठेवण्याची, आबाधित ठेवण्याची कल्पना होती. प्रत्येक व्यक्तीला जे मूलभूत अधिकार निसर्गत:च म्हणजे जन्मत: प्राप्त झालेले असतात त्यांना मानवी हक्क असे म्हणतात. हे अधिकार मनुष्याला जन्माने मिळतात हा विचार त्यामागे होता.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेपासून स्वतंत्र राज्यातील मानवाच्या हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे असा एक विचार नव्याने केला गेला. पूर्वी नैसर्गिक हक्क, मुलभूत हक्क, नागरी हक्क असे हक्कांचे प्रकार होते त्याबरोबरीने मानवी हक्क या हक्काचा विचार होऊ लागला. त्या अनुषंगाने १० डिसेंबर १९६६ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेमध्ये मानवी हक्कांचा समावेश झाला. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी कायदे करण्यात आले. मानवी हक्कांचे रक्षणाची जबाबदारी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आंतरराष्ट्रीय न्यायालय या यंत्रणेकडे सोपविण्यात आली.

आधुनिक स्वतंत्र व सार्वभौम राज्यांनी लिखित राज्यघटनेद्वारे आपल्या देशातील नागरिकांना हक्क प्रदान केले. हक्कांच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारली. परंतु त्यांच्याकडून मानवी हक्कांचे रक्षण योग्य रीतीने झाले नाही. त्यामुळे जागतिक पातळीवर नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली होऊ लागली. याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्कांची तरतूद आपल्या घटनेत केलेली दिसते. हक्काची जागतिक पातळीवरून अनेक वेळा पायमल्ली होतांना दिसते. मानवी हक्कांमध्ये जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य यांचा समावेश होतो.

**मानवी हक्कांचे वेगळेपण :** मानवी हक्कांचे स्वरुप हे नागरी हक्क व राजकीय हक्कांपेक्षा वेगळे आहे. मानवी हक्कामध्ये जे हक्क दिल्यावर मानवाची मानव म्हणून मान्यता मिळते त्या सर्व हक्कांना मानवी हक्कात मोडतात. हे हक्क मानवाला निसर्गत: मिळालेले असतात, जन्मत:च मिळलेले असतात. ज्याच्या शिवाय आपण एक माणूस म्हणून जगू शकत नाही. आपले जीवन किमान सुखाने व आनंददायी जागण्याच्या आपल्या नैतिक मागणीप्रती हे हक्क नैतिक हमी देतात. मानवी हक्क हे माणसाच्या व्यक्तिमत्वविकासासाठी मानवी मूल्यांच्या जागृतीसाठी, संवर्धनासाठी, बौद्धिक, वैचारिक व सद्सद्विवेकबुद्धीच्या वाढीसाठी आहेत. तसेच ते मानवाच्या आध्यात्मिक व इतर गरजा भागविण्याकरिता आवश्यक आहेत.

**माववी हक्कांची व्याप्ती :** मानवी हक्कांची व्याप्ती मोठी आहे. पारंपरिक हक्क आणि राजकीय हक्क यांचा एकीकडे व दुसरीकडे जे नव्याने विकसित झालेले हक्क आहेत उदा. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक यांचा समावेश होतो.

**मानवी हक्कांची परिणामकारकता :** मानवी हक्कांची परिणामकारकता ही कायदेशिर हक्कांमध्ये जेंव्हा ते विकसित होतात त्यावर आवलंबून असते. अशा परिस्थितीत एखाद्या विशिष्ट मानवी हक्कास कायदेशीर मान्यता नसते तेंव्हा नैतिक हक्कांना प्राधान्य देणे आवश्यक असते. असे केल्याने येणाऱ्या काळात या हक्काला कायद्याचे संरक्षण देण्याच्या दृष्टिने प्राधान्य देणे गरजेचे असते. आपल्याकडे यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवी जीवनातील अनैतिकता आणि दांभिकता अनुभवली म्हणून त्यांनी नैतिक हक्कांना कायदेशिर संरक्षण देऊ

मानवी हक्कामध्ये भाषण स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांना महत्व असते. या हक्कामुळे मानव इतर प्राणिमात्र यांच्यातील भेद स्पष्ट होतो. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ मध्ये सर्व नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. जागतिक मानवी हक्क सनदेमध्ये कलम १९ मध्ये प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा म्हणजेच प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला आहे.

मानवी हक्क यांना मानवी अधिकार असे म्हणतात हे मानवाचे मूलभूत अधिकार आहेत. मानवी हक्क यांचे स्वरुप वैश्विक असून हे सर्वांना समान प्रमाणात प्राप्त होतात. मानवी हक्क हे उपजत असतात. किंवा कायदेशीर असू शकतात. पुढील प्रमाणे मानवी हक्क हे प्रमुख मानले जातात.

१) जीवनाधिकार २) यातनांपासून मुक्तता ३) गुलामगिरीतून मुक्तता ४) कोर्ट सुनावणीचा अधिकार ५) भाषण स्वातंत्र्य ६) वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क उच्चायुक्त कार्यालय व मानवी हक्क समिती ह्या दोन जागतिक स्तरावरील संस्था आहेत. जागतिक पातळीवरून मानवी हक्काच्या अंमलबजावणीसाठी या संस्था प्रयत्न करतात.

**मानवी हक्क रक्षणार्थ उपाय :** मानवी हक्कांच्या बाबतीत विचार केल्यास असे दिसून येते की प्रत्येक देशात मानवी हक्कांची पायमल्ली होत असते. वरकरणी जगातील सर्व देश मानवी हक्कांचे समर्थन करतांना दिसतात. अनेक देशात मानवी हक्कांचे उलंघन होताना दिसते. परंतु संयुक्त राष्ट्रसंघटना मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सतत प्रयत्नशिल आहे हे स्पष्ट होते. मानवी छळ, क्रूरता व अनिष्ट वर्तन करणाऱ्या राष्ट्रांचा युनोने नेहमी धिक्कार केला. गुलामगिरी पद्धत नष्ट करणे तसेच

गुलामांचा क्रय विक्रय थांबविणे, वर्णद्वेषविरुद्ध व वसाहतवाद विरोधी धोरण ठेवण्यात संयुक्त राष्ट्रसंघटनेने नेहमीच आग्रही भूमिका घेतली. वंशविच्छेदाविरुद्ध कारवाई करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटना या जागतिक स्तरावरील संघटनेने वेळावेळी ठराव केले. याशिवाय नागरिकत्व नष्ट होणे, धार्मिक असहिष्णुता, स्थलांतरित कामगारांचे मानवी हक्क, संघर्ष काळातील मानवी हक्क यासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघटनेने लक्ष पुरविले आहे. स्थानिक जनता व राज्यकर्ते यामामधील हक्कांसंवंधी भेदभाव उदा. दक्षिण आफ्रिकेतील काळ्या व गोऱ्या लोकांच्या हक्कातील भेदभाव, अल्पसंख्यांक लोकांचे हक्क, मृत्यूदंडाची शिक्षा समूळ रद्द करणे इत्यादी प्रश्नांकडे सदर संघटना सतत लक्ष पुरवत असते. मानवी हक्काच्या रक्षणासाठी काही ठराव पास करण्यात आले आहेत. या ठरावाचा मुख्य हेतू व्यक्तीला स्वातंत्र्य रक्षणाची क्षमता देणे हा आहे उदा., राजकीय व नागरी हक्कांबाबत केलेला आंतरराष्ट्रीय ठराव, मानवी हक्काची पायमल्ली होऊ नये याकरिता त्यासंबंधी केलेल्या तक्रारींची नि:पक्षपातीपणे चौकशी करून निर्णय देण्याकरिता समितीची स्थापना करणे इत्यादी बाबी ठरावाने स्थापन करण्यात आल्या आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेद्वारे गुलामगिरी, वेठबिगार, वर्णभेद ह्यासारख्या व्यवहारावर बंदी घालणारे ठराव संमत झाले आहेत. जातिसंहारासारख्या दुष्ट चालीवर बंदी घालण्यात आली असून त्यांवर कडक शिक्षा सांगण्यात आल्या आहेत.

भारताने संविधानात मूलभूत हक्कांची तरतूद करून भारतीयांचे हक्क सुरक्षित केले आहेत. भारतीय संविधानामुळे भारतातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्य, स्त्रीया यांच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी शासनावर टाकली आहे. जगातील दारिद्र्, दु:ख, अज्ञान,विषमता यांचे उच्चाटण झाले तरच खऱ्याअर्थाने मानवी हक्क प्रस्थापित झाले आहेत असे म्हणता येईल.

## संदर्भ सूची

*देव विजय प्रल्हाद, २०१६, राज्यजिज्ञासा राजकीय संज्ञा, संकल्पना, सिद्धांत, अर्थ व आशय, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे*

*देशमुख भौमिक, २०२०, मानवी हक्कांचे संरक्षणकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे*

*पाटील आर. एन, १९९९, जागतिक संघटना (युनो), ज्ञानदा प्रकाशन, पुणे*

*बसू रुमकी (संपा), २०१७, आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना, सिद्धांत आणि समस्या, SAGE*

*महाराष्ट्र टाईम्स.कॉम मटा प्रतिनिधी अमरावती*

*वराडकर. र, घ, २०१०, भारत आणि जग, निराली प्रकाशन, पुणे*

*Das. B.C, vishwakosh.marathi.gov.in Indian*

*Government and Politics, Meerut, 1979*

*mr.vikaspedia.in/health*

*Publications India Pvt. Ltd, Mumbai*